आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

१० डिसेंबर २०२४ - मंगळवार

ठळक बातम्या

- देशात गरिबी आणि भूक निर्मूलन तसंच तरुणांना समान संधी देण्याबाबतीतली धोरणं राबवून भारतानं जगासमोर वस्तुपाठ दिला असल्याचं राष्ट्रपतींचं प्रतिपादन
- संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये आजही विविध कारणांवरून गदारोळ झाल्यानं दिवसभरासाठी कामकाज तहकूब
- राज्य विधानसभा निवडणुकीच्या वेळी व्हिव्हीपॅट चिठ्ठ्यांच्या पडताळणीबाबत सर्व प्रक्रियेचं पालन केलं असल्याचं निवडणूक आयोगाचं स्पष्टीकरण
- माजी राज्यपाल एस. एम. कृष्णा यांचं निधन
- मुंबईत बेस्ट बस अपघातातल्या मृतांची संख्या ६, मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी ५ लाख रुपये अर्थसहाय्य जाहीर

<><><><><>

देशात गरिबी आणि भूक निर्मूलन तसंच तरुणांना समान संधी देण्याबाबतीतली धोरणं राबवून भारतानं जगासमोर वस्तुपाठ दिला आहे, असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज सांगितलं. आंतरराष्ट्रीय मानवाधिकार दिवसानिमित्त नवी दिल्लीत विज्ञान भवन इथे आयोजित कार्यक्रमात त्या आज बोलत होत्या. या कार्यक्रमात मानसिक आरोग्याबाबत राष्ट्रीय परिषद होणार आहे.

आज जागतिक मानवी हक्क दिन आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेत १९४८ मध्ये मानवी हक्कांचा जाहीरनामा दहा डिसेंबरला प्रसिद्ध झाला होता. आपले हक्क, आपलं भविष्य, या क्षणी असं यंदाच्या मानवी हक्क दिनाचं ब्रीदवाक्य आहे.

मानवी हक्क उल्लंघनाची सुमारे २३ लाख प्रकरणं राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाच्या स्थापनेपासून नोंदवण्यात आली असून अशा प्रकरणांमधल्या पीडितांसाठी सुमारे २५६ कोटी रुपयांच्या निधीची शिफारस करण्यात आली आहे, असं आयोगानं प्रसिद्ध केलं आहे. दरम्यान सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश आणि राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाचे कार्यकारी अध्यक्ष न्यायमूर्ती बी. आर. गवई यांनी देशात या वर्षी राष्ट्रीय लोक अदालतींमध्ये सात कोटी सत्तर लाख प्रकरणं निकाली काढली गेल्याचं म्हटलं आहे. मानवी हक्क दिनानिमित्त आकाशवाणीला ते मुलाखत देत होते. देशात दर वर्षी तीन वेळा राष्ट्रीय लोक अदालती आयोजित केल्या जातात आणि अनेक वर्षांपासून थकीत असलेली प्रकरणं परस्पर सहमतीनं निकाली काढली जातात, अशी माहिती त्यांनी दिली.

<><><><>

जागतिक मानवाधिकार दिनाच्या निमित्ताने महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोगाने राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली राजभवन इथं एका विशेष कार्यक्रमाचं आयोजन केलं आहे. निवृत्त न्यायमूर्ती एन. एच. पाटील या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाविषयी अधिक माहिती आमच्या वार्ताहराकडून....

<><><><>

संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये आजही विविध कारणांवरून गदारोळ होऊन आधी दुपारी बारा वाजेपर्यंत आणि नंतर दिवसभरासाठी कामकाज तहकूब करण्यात आलं. लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी विरोधकांच्या वागणुकीबद्दल तीव्र नापसंती व्यक्त केली. सभागृहाच्या सभ्यतेचे पालन केलं जावं, तसंच देशातल्या जनतेच्या आशाआकांक्षांचा आदर राखत काम केलं जावं, असं आवाहन त्यांनी विरोधी नेत्यांना केलं.

राज्यसभेतही असंच चित्र दिसून आलं. आम आदमी पार्टीचे खासदार संजय सिंग यांनी दिल्लीतल्या कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न उपस्थित केला. यावर सत्ताधारी आणि विरोधक यांच्यात खडाजंगी झाल्यानं अध्यक्ष जगदीप धनखड यांनी कामकाज तहकूब केल्याचं जाहीर केलं.

संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी चर्चा आणि वादविवाद यांच्या माध्यमातून संसदेचं कामकाज चालवण्याचं आवाहन संसद सदस्यांना केलं आहे. काँग्रेस नेते राहुल गांधी यांचा संसदीय लोकशाहीवर विश्वास नसावा, अशी टीकाही रिजिजू यांनी संसद भवन परिसरात बातमीदारांशी बोलताना केली .

त्यापूर्वी आज सकाळी संसद भवन परिसरात विरोधी पक्षाच्या नेत्यांनी देशातल्या प्रमुख उद्योगसमूहानं केलेल्या तथाकथित लाचखोरीच्या मुद्द्यावरून निदर्शनं केली. लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी, काँग्रेस नेत्या प्रियांका गांधी, झारखंड मुक्ती मोर्चाच्या महुआ माझी, डी एम के च्या कनिमोळी इत्यादी नेते यात सहभागी झाले होते.

<><><><>

राज्यसभेत अध्यक्ष जगदीप धनखड यांच्याविरुद्ध काँग्रेसप्रणित इंडिया आघाडीने अविश्वास ठराव मांडला आहे. विरोधी पक्षांच्या सदस्यांना सभागृहात बोलण्याची संधी नाकारुन पक्षपात करत असल्याचा आरोप करत विरोधकांनी हा प्रस्ताव मांडला असल्याचं काँग्रेस नेते जयराम रमेश यांनी ट्विटरवर म्हटलं आहे. लोकशाहीच्या रक्षणार्थ नाईलाजाने विरोधी आघाडीला हा निर्णय घ्यावा लागल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

<><><><>

रिझर्व्ह बँकेचे नवे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांच्या नेतृत्वाखाली बँक तिच्या समोर असलेल्या आव्हानांचा प्रभावीपणे सामना करेल,असा विश्वास मावळते गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी आज व्यक्त केली. मुंबईत झालेल्या वार्ताहर परिषदेत ते बोलत होते. चलन फुगवट्याचं नियमन, बदलत्या जागतिक परिस्थितीनुसार अर्थव्यवस्थेवर होणारे परिणाम, सायबर सुरक्षा आणि संभाव्य धोके, बदलत्या तंत्रज्ञानानुसार यंत्रणेतले बदल तसंच या संदर्भातल्या नवीन कल्पना आणि सुधारणा अशा प्रकारच्या समस्या आणि प्रश्न अद्यापही बँकेच्या समोर असून नवे गव्हर्नर मल्होत्रा यांच्या नेतृत्वाखाली बँक त्यांचा सामना प्रभावीपणे करेल अस ते म्हणाले. शक्तिकांत दास आज रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर म्हणून निवृत्त होत असून त्यांच्या जागी संजय मल्होत्रा यांची गव्हर्नर म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

<><><><>

यूपीएससी अर्थात केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा मुख्य परीक्षा २०२४ चा निकाल जाहीर झाला आहे. या परीक्षेत निवड झालेले उमेदवार आता भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय परदेश सेवा, भारतीय पोलीस सेवा आणि इतर सेवांमध्ये

निवड होण्यासाठी व्यक्तिमत्त्व चाचणी मुलाखतीला सामोरे जातील. या मुलाखतीच्या तारखा नंतर जाहीर करण्यात येतील. हा निकाल आयोगाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**<><><><>**

प्रत्येक विधानसभा मतदारसंघातल्या कोणत्याही पाच मतदान केंद्रावरच्या **V V PAT** चिठ्ठ्या मोजणं आवश्यक आहे. यानुसार २३ नोव्हेंबर रोजी झालेल्या विधानसभा निवडणुकीच्या मतमोजणीवेळी प्रत्येक मदारसंघातल्या प्रत्येकी पाच मतदान केंद्रावरच्या **V V PAT** चिठ्ठ्या मोजण्यात आल्या होत्या, असं निवडणूक आयोगाने जारी केलेल्या पत्रकात म्हटलं आहे. त्यावेळी उमेदवारांचे प्रतिनिधी उपस्थित होते असंही यात म्हटलं आहे. या मोजणीनुसार २८८ मतदारसंघातल्या १ हजार ४४० **V V PAT** युनिटची मोजणी करून ते संबंधित कंट्रोल युनिट डाटाशी जुळवून पाहण्यात आलं. दोन्हींची मोजणी केली असता आकड्यात कुठलीही तफावत आढळून आली नाही. त्यामुळे निवडणूक आयोगानं मतमोजणीवेळी सर्व प्रक्रियेचं पालन केलं आहे, असं पत्रकात स्पष्ट करण्यात आलं आहे.

**<><><><>**

माजी राज्यपाल एस. एम. कृष्णा यांचं आज पहाटे बेंगळुरू इथे त्यांच्या निवासस्थानी वृद्धापकाळाने निधन झालं. ते ९२ वर्षांचे होते. प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांना काही दिवसांपूर्वी बेंगळुरू इथल्या रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. रुग्णालयातून घरी आल्यानंतर पुन्हा त्यांची प्रकृती खालावली आणि आज पहाटे त्यांचं निधन झालं.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी कृष्णा यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे. कृष्णा हे अनुभवी संसदपटू होते. साहित्य, शास्त्रीय संगीत आणि टेनिस अशा विविध विषयांची आवड असलेल्या कृष्णा यांनी आपल्या राज्यपाल पदाची प्रतिष्ठा कायम जपली. त्यांच्या निधनामुळे देशाने राजकारणातलं एक सुसंस्कृत आणि अभिरुचीसंपन्न व्यक्तिमत्त्वं गमावलं असल्याची भावना राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी आपल्या शोकसंदेशात व्यक्त केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही कृष्णा यांना आदरांजली वाहिली आहे. आधुनिक भारताच्या विकासाचा मार्ग दाखवणारं नेतृत्व गमावल्याची भावना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपल्या शोकसंदेशात व्यक्त केली आहे. एस. एम. कृष्णा यांचं मार्गदर्शन अनेक राज्यांना त्यांच्या विकासाच्या मार्गात प्रेरणादायी ठरेल, अशा शब्दांत काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी आदरांजली वाहिली आहे.

एस. एम. कृष्णा यांनी आपल्या दीर्घ राजकीय कारकिर्दीत अनेक महत्त्वाची पदं भूषवली. १९९९ ते २००४ या काळात ते कर्नाटकचे मुख्यमंत्री होते. २००९ ते २०१२ पर्यंत परराष्ट्र मंत्री म्हणूनही कार्यरत होते.

**<><><><>**

मुंबईत कुर्ला इथं बेस्ट बसच्या भीषण अपघातातील मृतांची संख्या सहावर पोहचली आहे. तर, जखमींची संख्या ४२ झाली आहे. जखमींना उपचारासाठी मुंबईतील विविध रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या दुर्घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं आहे. तसंच, मृतांच्या वारसांना मुख्यमंत्री सहायता निधीतून पाच लाख रुपये आर्थिक मदत जाहीर केली आहे. अपघातातल्या जखमींच्या उपचाराचा खर्च मुंबई महापालिका आणि बेस्टच्या वतीने करण्याचे आदेशही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत.

**<><><><>**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे कार्यकारी सचिव म्हणून देवजित सैकिया यांची नियुक्ती अध्यक्ष रॉजर बिन्नी यांनी केली आहे. सध्याचे सचिव जय शहा यांची आंतरराष्ट्रीय क्रिकेट समितीचे अध्यक्ष म्हणून नेमणूक झाल्यामुळे सैकिया यांची नियुक्ती करण्यात आली आहे. कायमस्वरूपी सचिवांची नेमणूक होईपर्यंत सैकिया कार्यकारी सचिव म्हणून कार्यरत राहतील.

**//<><><><><>//**